नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 21/10/2020 (बुधवार)
(दुपार)

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 15 कि.मी. अंतरावरील समद्री मोहपा रोडवर खरबरे यांचे ढाब्या जवळ येथे दिनांक 20/10/2020 चे 18:00 वा. ते 18.30 वा. दरम्यान आरोपीने त्याच्या ताब्यातील एमएच–40/एके–4276 क्रमांकाची माल वाहु बोलेरोने मोहपा ते कोहळी कडे भरघाव वेगाने व निष्काळजीपणे धोखादायक रित्या चालवित नेतांना कोहळी ते मोहपा कडे जाणारे एमएच–31/एडब्लु–1421 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार मदन तेजराम पांडे, वय 45 वर्ष, कळमेश्वर यांचे डोक्याला मार लागुन त्यांचा मृत्यु झाला. तर मोटरसायकल मागे बसलेल्या त्रिवेणी पांडे या जखमी झाल्या.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिलीप हुकुमचंद पांडे, वय 40 वर्ष, रा वार्ड क्रं 4 ब्राम्हणी यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ), 337 भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री. गावंडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर